नि.दि.दा.क्रमांक. १३/२०२२

निशाणी क्र.५० वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ तर्फे प्रतिवादीं विरुध्द झालेला विना म्हणणे व कैफियतचा आदेश रद्द करणेबाबत दाखल केला आहे. अर्जाच्या समर्थनार्थ निशाणी क्र.५१ कडे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

२. वादीतर्फे अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नाकारला असून अर्जातील मजकूर चुकीचा आहे, नमूद कारणाकरीता वैद्यकीय पुरावा दाखल केला नाही, कारण योग्य व संयुक्तीक नाही, प्रतिवादी यांना सर्व माहिती होती, झालेल्या विलंबाबाबत वेगळा अर्ज दिला नही, त्यामूळे अर्ज नामंजूर करावा व रक्कम रुपये १०,०००/- खर्च लावावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ तर्फे वकील श्री चव्हाण यांचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे वकील श्री भादूले पुकारता गैरहजर.

४. प्रस्तूतचा दावा मनाईसाठी व हक्कज्ञापनासाठी दाखल केला आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीस त्यांचा बचाव न्यायालयात दाखल करण्याची संधी देणे दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी आवशक व महत्वाचे आहे. तसे न केल्यास प्रतिवादीस संधी नाकारल्यासारखे होवून त्यांचे नुकसान होणार आहे. याउलट, वादीला कोणतेही नुकसान नाही. म्हणून नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन मी खालील प्रमाणे आदेश परीत करीत आहे.

आदेश

१. अर्ज रक्कम रुपये ५००/- च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो.
२. प्रतिवादी क्र.१ ने खर्चाची रक्कम वादीस दिल्यानंतर किंवा न्यायालयात जमा केल्यानंतर त्याची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.
३. प्रतिवादी क्र.१ ने पुढील तारखेपर्यंत रक्कम जमा न केल्यास प्रस्तूतचा अर्ज रद्द समजण्यात यावा.

[ एम.आर.कामत]

दिनांक -१५.०६.२०२३. सह. दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, पंढरपूर.

**Certificate**

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : Rajiv M. Gogi |
| (b) | Court. | : Jt. C.J.J.D., Pandharpur |
| (c) | Part of judgment dictated on | : 15.06.2023 |
| (d) | Uploaded on | : 15.06.2023 |